सोमवार दि. ०१ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जीवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसमध्ये सुविधांचा अभाव

### *स्वच्छतागृहातील घाण पाणी प्रवाशांच्या आसनापर्यंत, प्रवाशांची तीव्र नाराजी*

**दत्ता देशमुख । प्रतिनिधी**

देशातील आधुनिक आणि वेगवान रेल्वे सेवांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसमध्ये प्रवाशांना मूलभूत सुविधांअभावी मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची बाब समोर आली आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान, वेगवान प्रवास आणि दर्जेदार सुविधांचा दावा करणाऱ्या या रेल्वेच्या एका कोचमध्ये स्वच्छतागृहातील घाण पाणी थेट प्रवाशांच्या आसनापर्यंत पोहोचल्याने संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत प्रवासी मोहम्मद बाईयाश यांनी रेल्वे प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी (दि. ३० मे) मुंबईहून नांदेडकडे निघालेल्या वंदे भारत एक्सप्रेसच्या सी-८ कोचमध्ये ही घटना घडली. कोचमधील स्वच्छतागृहाची योग्य देखभाल आणि स्वच्छता न राखल्यामुळे तेथील साचलेले घाण पाणी बाहेर येऊन कोचमध्ये पसरले. काही वेळातच हे पाणी प्रवाशांच्या आसनांपर्यंत पोहोचल्याने प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. *(पान २ वर)*

## आचारसंहितेनंतर अहिल्यादेवींच्या भव्य स्मारकास गती देणार

### अभिवादन सोहळ्यात महापौर व उपमहापौरांची ग्वाही; जालना शहरात उभारले जाणार ऐतिहासिक आणि सर्वाधिक उंच स्मारक

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भव्य आणि ऐतिहासिक स्मारकाच्या उभारणीस विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर गती देण्यात येणार असल्याची ग्वाही महापौर वंदनाताई मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी दिली. स्मारकाच्या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्याची तयारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवारी (दि. ३१ मे) व्याख्यानमाला समितीच्या वतीने नियोजित स्मारक स्थळी अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करत उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले.

**घोषणांनी परिसर दणाणला**

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी ''येळकोट... येळकोट...'', ''जय मल्हार...'', ''राष्ट्रमाता, राजमाता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला. महिला, युवक आणि अहिल्यादेवींचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

**स्मारकासाठी लोकसहभागाची गरज**

कार्यक्रमाच्या प्रारंभी व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर यांनी प्रास्ताविकातून स्मारक उभारणीच्या संकल्पनेची माहिती दिली. शासन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून हे स्मारक उभारण्यात येत असल्याने नागरिकांनी सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच ४ व ५ जून रोजी टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही *(पान २ वर)*

## लोखंडी सळ्या चोरीप्रकरणी चोरटा महिंद्रा पिकअपसह जेरबंद; ११ लाखांचा मुद्देमाल जप्त

### हसनाबाद पोलिसांची पहाटेच्या गस्तीदरम्यान धडक कारवाई

**भोकरदन - प्रतिनिधी**

हसनाबाद पोलिसांनी पहाटेच्या गस्तीदरम्यान संशयित महिंद्रा पिकअप वाहन अडवून तपासणी केली असता चोरीच्या लोखंडी सळ्या वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस अटक करून तब्बल ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे परिसरातील मालमत्ता चोरी करणाऱ्या टोळींच्या हालचालींवर पोलिसांनी प्रभावी अंकुश आणल्याचे दिसून येत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक ३० मे २०२६ रोजी रात्री ११ ते ३१ मे रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत हसनाबाद व जानेफळ बिट परिसरात पोहेकॉ. भरतकुमार चौधरी, पोकॉ. नारायण



चरावंडे, पोकॉ. दीपक सोनुने व पोकॉ. प्रकाश बोर्डे हे नियमित रात्रीची गस्त करीत होते. दरम्यान, ३१ मे रोजी पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास हसनाबाद फाटा परिसरात हसनाबाद गावाच्या दिशेने एक महिंद्रा कंपनीचा पिकअप संशयास्पदरीत्या भरधाव वेगाने येताना दिसला. संशय आल्याने पोलिसांनी तत्काळ वाहन थांबवून चालकाची चौकशी केली. चालकाने वाहन स्वतःच्या मालकीचे असल्याचे सांगितले; मात्र वाहनाची कागदपत्रे सादर करण्यास टाळाटाळ केली. तसेच वाहनातील मोठ्या प्रमाणातील लोखंडी सळ्यांबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही.

याबाबत प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश उबाळे यांना माहिती देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालकाची अधिक कसून चौकशी करण्यात आली. तरीही तो वाहन व मालाच्या मालकीबाबत कोणतेही पुरावे सादर करू शकला नाही. त्यामुळे पोलिसांचा संशय अधिक बळावला.

पंचांसमक्ष चौकशी केली असता आरोपीने आपले नाव विजय बाबुराव पाखरे (वय ३६, रा. साठेनगर, अंबड, जि. जालना) असे सांगितले. त्याच्याकडे असलेल्या लोखंडी सळ्या व वाहनाबाबत कोणतेही वैध कागदपत्र नसल्याने पोलिसांनी पंचनामा करून मुद्देमाल जप्त केला.

**जप्त मुद्देमाल**

महिंद्रा कंपनीचा पिकअप वाहन - किंमत अंदाजे ७ लाख ५० हजार *(पान २ वर)*

## 'एक मतानेही निकाल बदलू शकतो'; गुजरात उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय, अटकेतील व्यक्तीला मतदानाची परवानगी

**जालना - प्रतिनिधी**

लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक मताचे महत्त्व अधोरेखित करणारा एक महत्त्वपूर्ण अंतरिम आदेश गुजरात उच्च न्यायालयाने दिला आहे. जुनागढ तालुका पंचायतीच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत एका मतानेही निकाल फिरू शकतो, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अटकेत असलेल्या एका व्यक्तीला पोलीस संरक्षणात मतदान करण्याची परवानगी दिली. न्यायमूर्ती डी. एन. रे यांच्या एकसदस्यीय पिठाने दिलेल्या या निर्णयामुळे लोकशाही हक्कांच्या संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. प्रणव प्रभुदास चंदाराणा यांनी दाखल केलेल्या हेबियस कॉर्पस याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हा आदेश दिला.

याचिकाकर्त्याच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणाऱ्या निवडणुकीच्या अगदी आदल्या दिवशी, म्हणजेच २४ मे २०२६ रोजी अटक करण्यात आली. ही अटक केवळ मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याच्या हेतूने करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला.

याउलट, राज्य सरकारने सांगितले की, संबंधित गुन्हा २२ मे २०२६ रोजीच दाखल झाला होता आणि केवळ निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणण्यासाठी विलंबाने याचिका दाखल करण्यात आली आहे.

सरकारी पक्षाने पुढे असा युक्तिवाद केला की, याचिकाकर्त्यावरील गुन्हे गंभीर स्वरूपाचे आहेत आणि केवळ निवडणूक आहे म्हणून कोणतीही सवलत दिली जाऊ नये. केवळ मतदानाच्या दिवशी निवडणूक आहे, या कारणास्तव याचिकाकर्त्याला मतदानाचा हक्क नाकारण्याच्या उद्देशाने अटक/अटक करण्यात आली आहे, असे म्हणता येणार नाही, असेही सरकारने स्पष्ट केले. या प्रकरणी सकाळी ९:३० वाजता न्यायालयासमोर उल्लेख करण्यात आला होता आणि न्यायालयाने रजिस्ट्रिला तात्काळ फाईल सादर करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, असे निर्देश देऊनही फाईल ११:४५ वाजता, म्हणजेच २ तास १५ मिनिटांनी न्यायालयासमोर आली, या विलंबाचीही न्यायालयाने गंभीर दखल घेतली.

सर्व युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायमूर्ती रे यांनी आपल्या आदेशात म्हटले की, जुनागढ तालुका पंचायतीच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक ही एक महत्त्वाची प्रक्रिया आहे, जिथे एका मतानेही निकाल एका बाजूने किंवा दुसऱ्या बाजूने झुकू शकतो. त्यामुळे, न्यायाच्या हितासाठी, सध्याच्या परिस्थितीत, न्यायालय अंतरिम आदेश देत आहे. न्यायालयाने निर्देश दिले की, याचिकाकर्त्याला स्वतःच्या खर्चाने पोलीस बंदोबस्तात (जाप्ता) थेट मतदान केंद्रावर नेण्यात यावे. मतदान केल्यानंतर त्यांना तात्काळ पुन्हा कोठडीत आणले जावे आणि ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणूक प्रक्रिया थांबवून ठेवावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयाने रजिस्ट्रिला आदेशाची प्रत सर्व संबंधित पक्षांना तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच *(पान २ वर)*

## जालना येथे ज्येष्ठ अधिक मासानिमित्त इष्टलिंग महापूजा, धर्मसभा व दर्शन सोहळ्याचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

ज्येष्ठ अधिक मासानिमित्त प. पू. श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पावन उपस्थितीत भव्य इष्टलिंग महापुजा, ग्रंथ दिंडी, धर्मसभा, दर्शन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक व आध्यात्मिक सोहळा बुधवार दिनांक 0३ जून २०२६ रोजी श्री मन्मथ स्वामी मंदीर, जुना जालना तसेच श्री व्यंकटेश मंगल कार्यालय, जुना जालना येथे मोठया उत्साहात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमामुळे जालना शहरासह परिसरातील वीरशैव लिंगायत समाजात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये मोठी उत्सुकता पहायला मिळत आहे. धार्मिक परंपरा, संस्कृती आणि आत्ध्यात्मिक विचारांचा प्रसार करण्यासाठी हा सोहळा महत्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९.00 वाजता इष्टलिंग महापूजेद्वारे होणार आहे.




त्यानंतर सकाळी ११.00 वाजता भव्य धर्मसभेचे आयोजन करण्यात आले असून महास्वामीजी भक्तांना मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी १.00 वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ग्रंथदिंडी व दर्शन सोहळयामुळे भक्तांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे.या कार्यक्रमास विविध भागांतील मठाधीश, धर्मगुरु, समाजबांधव आणि हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती ष. ब्र. श्री १०८ सद्गुरु डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थान यांनी दिली आहे. कार्यक्रमाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात *(पान २ वर)*

## टेंभुर्णीला नगरपंचायत का नाही? आदेशासाठीची फाईल नेमकी कुठे अडकली; गावातील नेतेमंडळी गप्प का?

### २० हजारांहून अधिक लोकसंख्या, वाढता नागरी विस्तार; तरीही नगरपंचायतीचे स्वप्न अधांतरी

**टेंभुर्णी । दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील सर्वात मोठ्या गावांपैकी एक असलेल्या टेंभुर्णीला नगरपंचायतीचा दर्जा मिळावा, ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. विशेषतः गेल्या वर्षभरात ग्रामस्थांनी मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि स्थानिक प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. मात्र आजतागायत नगरपंचायतीबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे.


दरम्यान, ग्रामपंचायतीची मुदत फेब्रुवारी महिन्यात संपल्यानंतर आता पुन्हा ग्रामपंचायत निवडणुकांची प्रक्रिया सुरू होण्याचे संकेत मिळाले आहेत. शासनाने मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या वॉर्डनिहाय आरक्षणाचा कार्यक्रम जाहीर करण्याच्या हालचाली सुरू केल्याने टेंभुर्णीमध्ये आगामी निवडणूक नगरपंचायतीची होणार की पुन्हा ग्रामपंचायतीचीच, याबाबत चर्चा रंगू लागली आहे.

लोकसंख्या वाढली, गरजा वाढल्या; पण व्यवस्था तीच

टेंभुर्णी गावाची लोकसंख्या २० हजारांहून अधिक असून गावाचा विस्तारही झपाट्याने वाढत आहे. नवीन वसाहती, वाढती घरे, व्यापारी प्रतिष्ठाने आणि नागरी स्वरूपाच्या गरजा निर्माण होत असताना ग्रामपंचायत यंत्रणा मात्र मर्यादित संसाधनांवर काम करत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वित्त आयोगातून मिळणारा निधी गावाच्या वाढत्या गरजांच्या तुलनेत अपुरा पडत आहे. परिणामी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, अंतर्गत रस्ते, नाली बांधकाम, स्वच्छता आणि इतर मूलभूत सुविधा यांची कामे रखडत आहेत.

सध्या गावात १५ ते २० दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे महिलांना आणि नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. नगरपंचायतीचा दर्जा मिळाल्यास




शासनाकडून अधिक निधी उपलब्ध होईल आणि विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

**नगरपंचायतीची फाईल नेमकी कुठे अडकली?**

नगरपंचायतीच्या मागणीसाठी विविध स्तरांवर निवेदने देण्यात आली असली तरी प्रत्यक्षात प्रस्तावाची वाटचाल अत्यंत संथ असल्याचे चित्र आहे.

माहितीनुसार, ग्रामपंचायत स्तरावरून प्रस्ताव गटविकास अधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर तो मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयाकडे गेला. मात्र त्यापुढील प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. नगरपंचायतीची फाईल जिल्हास्तरावरच प्रलंबित असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

यामुळे नागरिकांमध्ये एकच प्रश्न उपस्थित होत आहे की, नगरपंचायतीचा प्रस्ताव नेमका कोणत्या टप्प्यावर आहे आणि आदेशासाठीची फाईल कुठे थांबली आहे?

गावातील नेतेमंडळी मौन का बाळगत आहेत?

नगरपंचायतीच्या प्रश्नावर गावातील विविध राजकीय पक्षांचे नेते, माजी पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांची भूमिका देखील चर्चेचा विषय बनली आहे.

ग्रामस्थांच्या मते, निवडणुकांच्या काळात विकासाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. मात्र नगरपंचायतीसारख्या महत्त्वाच्या विषयावर सर्वपक्षीय पातळीवर एकत्रित प्रयत्न होताना दिसत नाहीत. त्यामुळे काही राजकीय मतभेद किंवा स्थानिक गटबाजी नगरपंचायतीच्या मार्गात अडथळा ठरत आहे का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**निजामकालीन इतिहास असलेली मोठी ग्रामपंचायत**

टेंभुर्णी ही निजाम राजवटीपासून अस्तित्वात असलेली मोठी ग्रामपंचायत आहे. जाफराबाद तालुक्यातील महत्त्वाचे व्यापारी व प्रशासकीय केंद्र म्हणून गावाची ओळख *(पान २ वर)*

# संपादकीय...

## सरकारला दिलेली शेवटची संधी की नव्या संघर्षाची चाहूल?

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्राने अनेक आंदोलनांचे, उपोषणांचे आणि राजकीय घडामोडींचे साक्षीदार झाले आहे. अंतरवाली सराटी हे गाव आता केवळ जालना जिल्ह्यातील एक सामान्य गाव राहिलेले नाही, तर मराठा आरक्षणाच्या संघर्षाचे प्रतीक बनले आहे. या गावातून पुन्हा एकदा मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले आणि काही तासांतच शासनाशी झालेल्या चर्चेनंतर ते मागेही घेतले. मात्र, उपोषण संपले म्हणजे प्रश्न सुटला, असे म्हणता येणार नाही. या आंदोलनाची सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मराठा समाजामध्ये अजूनही शासनाच्या आश्वासनांबाबत विश्वास निर्माण झालेला दिसत नाही. गेल्या अनेक महिन्यांपासून हैदराबाद गॅझेट, सगेसोयरे, कुणबी नोंदी आणि ओबीसी प्रवर्गातून आरक्षण या मुद्यांवर चर्चा सुरू आहे. शासनाने विविध निर्णय घेतल्याचा दावा केला असला तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि त्यातून समाजाला मिळणारा लाभ याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसले, यामागे केवळ राजकीय दबाव निर्माण करण्याचा हेतू नव्हता, तर शासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी होत नसल्याची भावना मोठ्या प्रमाणावर समाजामध्ये असल्याचे दिसून आले. रखरखत्या उन्हात बाजेवर बसलेले जरांगे आणि त्यांच्या समर्थनार्थ जमलेला जनसमुदाय हे चित्र शासनासाठी एक गंभीर इशारा होता.

दुसरीकडे शासनाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. राज्य सरकारने विशेष मसुदा तयार करून शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत पाठविले. याचा अर्थ सरकार हा प्रश्न संवादातून सोडविण्याच्या भूमिकेत आहे. मात्र, मराठा समाजाला आता केवळ आश्वासने नकोत, तर प्रत्यक्ष परिणाम दिसणे अपेक्षित आहे. कारण आरक्षणाचा प्रश्न हा केवळ राजकीय नसून सामाजिक आणि आर्थिक न्यायाशी संबंधित आहे.

या संपूर्ण घडामोडीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो तो म्हणजे मराठा आणि ओबीसी समाजांमधील वाढणारा तणाव. आरक्षणाच्या मागणीमुळे दोन समाजांमध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण होणार नाही, याची काळजी शासनाने घेणे आवश्यक आहे. सामाजिक सलोखा अबाधित ठेवत संविधानिक चौकटीत तोडगा काढणे ही सरकारसमोरील सर्वात मोठी जबाबदारी आहे.

उपोषण मागे घेण्यात आले असले तरी आंदोलन संपलेले नाही. मनोज जरांगे यांनी सरकारला आणखी एक संधी दिली आहे, असे म्हणता येईल. मात्र ही संधी शेवटची ठरणार की पुढील संघर्षाची प्रस्तावना, हे येणारा काळच ठरवेल.

आजची परिस्थिती पाहता मराठा समाजाला भावनिक आश्वासनांपेक्षा ठोस प्रशासकीय निर्णय हवे आहेत. सरकारने दिलेली आश्वासने वेळेत पूर्ण केली, तर संवादाचा मार्ग मजबूत होईल. अन्यथा महाराष्ट्र पुन्हा एका मोठ्या आंदोलनाच्या उंबरठ्यावर उभा राहू शकतो.

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका समाजाचा प्रश्न नसून राज्याच्या सामाजिक समतोलाशी निगडित विषय आहे. त्यामुळे राजकारणापलीकडे जाऊन सर्व पक्ष, समाजघटक आणि शासन यांनी जबाबदारीने भूमिका घेण्याची गरज आहे. अंतरवाली सराटीत उपोषण संपले असले तरी आरक्षणाच्या लढ्याचा अध्याय अद्याप संपलेला नाही, हे वास्तव नाकारता येणार नाही.

# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७८ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत.

लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७८ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

पान १ व ४ वरुन....

## मुंबई-नांदेड...

**दुर्गंधीमुळे प्रवाशांचे हाल**

स्वच्छतागृहातून बाहेर आलेल्या घाण पाण्यामुळे संपूर्ण कोचमध्ये दुर्गंधी पसरली. त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागला. अनेक प्रवाशांनी दुर्गंधीमुळे संबंधित परिसर टाळण्याचा प्रयत्न केला; मात्र कोचमधील मर्यादित जागेमुळे त्यांना अस्वस्थ वातावरणातच प्रवास करावा लागला.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, वंदे भारत एक्सप्रेसमध्ये आधुनिक सुविधांचा गाजावाजा केला जातो. बाहेरील दरवाजे, कोचमधील यंत्रणा आणि अनेक सुविधा सेन्सर-आधारित व स्वयंचलित आहेत. मात्र प्रत्यक्षात स्वच्छतागृहांच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशांना अपेक्षित दर्जाचा अनुभव मिळत नाही.

**स्वच्छतागृहात पाण्यासाठी स्टीलचे भांडे**

या घटनेतील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे स्वच्छतागृहात पाणी घेण्यासाठी स्टीलचे भांडे ठेवण्यात आल्याचे प्रवाशांनी निदर्शनास आणले आहे. आधुनिक आणि अत्याधुनिक रेल्वे म्हणून ओळख असलेल्या वंदे भारतमध्ये अशा प्रकारची व्यवस्था पाहून अनेक प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यामुळे बाह्यरूपाने अत्याधुनिक असलेली रेल्वे अंतर्गत व्यवस्थापनाच्या बाबतीत मात्र सामान्य रेल्वेप्रमाणेच असल्याची भावना प्रवाशांमध्ये निर्माण झाली आहे.

**तक्रारीनंतरही तत्काळ दखल नाही**

प्रवासी मोहम्मद बाईयाश यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांकडे आणि प्रशासनाकडे तक्रार नोंदवूनही या समस्येची तत्काळ दखल घेतली गेली नसल्याचा आरोप केला आहे. बराच वेळ घाण पाणी आणि दुर्गंधीच्या वातावरणात प्रवाशांना प्रवास करावा लागला. त्यामुळे रेल्वे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

**हजारो रुपये खर्चूनही अपेक्षित सुविधा नाहीत**

वंदे भारत एक्सप्रेसमध्ये प्रवासासाठी प्रवासी इतर रेल्वेगाड्यांच्या तुलनेत अधिक भाडे भरतात. आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाच्या अपेक्षेने हजारो रुपये खर्च करणाऱ्या प्रवाशांना मात्र अशा मूलभूत सुविधांअभावी नाराजी व्यक्त करावी लागत आहे. स्वच्छता, देखभाल आणि प्रवासी सेवांमध्ये सुधारणा करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

**रेल्वे प्रशासन काय म्हणते?**

या संदर्भात रेल्वे प्रशासनाकडे तक्रार पोहोचली असून संबंधित प्रकरणाची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे प्राथमिक स्तरावर सांगण्यात आले आहे. मात्र भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नियमित तपासणी, स्वच्छता व्यवस्थेचे काटेकोर पालन आणि प्रवाशांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असल्याची भावना प्रवासी व्यक्त करत आहेत.

**''वंदे भारतचा वेग उत्कृष्ट, पण सुविधा प्रश्नचिन्हाखाली''**

मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेसने प्रवासाचा वेळ कमी केला असला तरी प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधांबाबत अनेकदा तक्रारी समोर येत आहेत. स्वच्छता, देखभाल आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. रेल्वे प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

## आचारसंहितेनंतर अहिल्यादेवींच्या...

त्यांनी सांगितले.

**''स्मारक जालन्याची ओळख ठरेल''**

यावेळी बोलताना महापौर वंदनाताई मगरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. जालना शहरात उभारले जाणारे हे स्मारक केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती जपणारे ठरणार नसून भविष्यात शहराची एक वेगळी ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपमहापौर राजेश राऊत यांनीही स्मारकाच्या कामासाठी महानगरपालिकेचे पूर्ण सहकार्य राहील, असे आश्वासन दिले.

**निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात**

स्मारक समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अंबड चौफुली परिसरात उभारण्यात येणारे हे स्मारक ऐतिहासिक, आकर्षक आणि उंचीच्या दृष्टीने विशेष असणार आहे. स्मारकाच्या उभारणीसाठी आवश्यक असलेली निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून आचारसंहिता संपताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.

या स्मारकामुळे जालना शहराच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवात भर पडणार असून राज्यभरातून पर्यटकांचे आकर्षण वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

या अभिवादन सोहळ्यास माजी मंत्री राजेश टोपे, रणजित मगरे, व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष पंडितराव तडेगांवकर, सचिव सुनंदा बनसोडे, भाजपचे युवा नेते शिवप्रकाश चितळकर, स्मारक समितीचे सचिव शांतीलाल बनसोडे, उपाध्यक्षा सुरेखा गाडेकर, कोषाध्यक्ष तुकाराम कोल्हे, सहसचिव सरिता तरवटे, सदस्य संतोष लव्हटे, सौरभ भिसे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. तसेच उद्योजक शिवाजीराव पाटील, कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर, बाबासाहेब तरवटे, बी. एस. आबुज, भगवान माथले, सूर्यभान दहेकर, शंकरराव काळे, डॉ. राजेंद्र गाडेकर, प्रा. लहुजी दरगुडे, ज्ञानेश्वर भुसारे, उद्धव काळे, संजय आधे, भरत गडदे, देवीदास शेळके, बाबासाहेब वैद्य, निवृत्ती वीर, रामदास काळे, कपिल दहेकर, भाऊसाहेब आटोळे, राजेश शिंगाडे, बळीराम मिसाळ, बाबासाहेब पाझाडे, नारायण पाझाडे, विठ्ठल मुगटकर, किशोर कडेवार, वैभव काळे, सुभाष कडेवार, मनीषा लव्हटे, सारिका दहेकर, पांडुरंग तायडे, शिवाजी कोल्हे, ज्ञानदेव मापारी, कृष्णा जोशी, माधव वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचा समारोप सचिव सुनंदा बनसोडे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

**४ व ५ जूनला व्याख्यानमाला**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला समितीच्या वतीने ४ व ५ जून रोजी टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात विशेष व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. इतिहास, समाजकारण आणि अहिल्यादेवींच्या कार्यावर आधारित विविध मान्यवरांचे मार्गदर्शन या कार्यक्रमात होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## लोखंडी सळ्या...

लोखंडी सळ्या (अंदाजे ४ टन वजन) - किंमत अंदाजे ३ लाख ५० हजार

एकूण जप्त मुद्देमाल : ११ लाख पोलिसांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपासादरम्यान जप्त करण्यात आलेल्या लोखंडी सळ्या व वाहनाचा मागोवा घेतला असता हा माल धाड पोलीस स्टेशन हद्दीतील (जि. बुलढाणा) चोरीच्या घटनेशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंग संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी योगेश उबाळे, पोउपनि सखाहरी तायडे, सफौ. मंगलसिंग सोळंके, पोहेकॉ. भरतकुमार चौधरी, पोहेकॉ. दुर्गेश राठोड, पोकॉ. दीपक सोनुने, पोकॉ. प्रकाश बोर्डे, पोकॉ. नारायण चरावंडे, पोकॉ. शंकर क्षीरसागर, पोकॉ. नितेश खरात व पोकॉ. अनिल सवडे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

**हसनाबाद पोलिसांची सतर्कता ठरली निर्णायक**

पहाटेच्या गस्तीदरम्यान पोलिसांनी दाखविलेल्या सतर्कतेमुळे लाखो रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात यश आले. संशयास्पद वाहनांची तपासणी व नियमित गस्त यामुळे गुन्हेगारांवर प्रभावी वचक निर्माण होत असून, या कारवाईचे परिसरात स्वागत होत आहे.

## 'एक मतानेही निकाल...

अतिरिक्त सरकारी वकिलांना संबंधित तालुका विकास अधिकारीआणि जिल्हा विकास अधिकारीयांना दूरध्वनीवरून आदेशाची माहिती देऊन त्याचे पालन सुनिश्चित करण्यास सांगितले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जून रोजी निश्चित करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण निकालावर प्रतिक्रिया देताना, जालना येथील नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत म्हणाले, गुजरात उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करणारा आहे. कोणत्याही व्यक्तीला, जोपर्यंत तो कायद्याने दोषी ठरत नाही, तोपर्यंत त्याच्या नागरी आणि लोकशाही हक्कांपासून वंचित ठेवता येणार नाही, हा या निकालाचा गाभा आहे. न्यायव्यवस्थेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, ती नागरिकांच्या हक्कांची सजग प्रहरी आहे. एका मताचे महत्त्व ओळखून न्यायालयाने दिलेला हा आदेश, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निष्पक्षता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल. एकंदरीत, या निकालाने केवळ एका व्यक्तीला मतदानाचा हक्क मिळवून दिला नाही, तर भविष्यात अशा प्रकरणांमध्ये एक सकारात्मक पायंडा पाडला आहे. लोकशाहीत मताधिकाराचे स्थान सर्वोच्च आहे आणि कोणत्याही परिस्थितीत त्याचे हनन होता कामा नये, हाच संदेश या निर्णयातून संपूर्ण देशाला मिळाला आहे.

## जालना येथे ज्येष्ठ...

असून परिसरात आकर्षक सजावट करण्यात येत आहे. समस्त वीरशैव लिंगायत समाज, जालना व परिसर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन मन्मथ धाम मठ संस्थानचे मठाधिपती डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराजांनी केले आहे.

## टेंभुर्णीला नगरपंचायत...

आहे. त्यामुळे गावाला नगरपंचायतीचा दर्जा मिळणे ही काळाची गरज असल्याचे अनेक जाणकारांचे मत आहे.

**नगरपंचायतीसाठी गाव एकत्र आले पाहिजे**

ग्रामस्थांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून नगरपंचायतीच्या प्रश्नावर एकत्र येणे गरजेचे आहे. अन्यथा टेंभुर्णी विकासाच्या शर्यतीत आणखी मागे पडेल. शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून हा प्रश्न मार्गी लावावा लागेल.

**- जनार्धन झोरे,**
**सामाजिक कार्यकर्ता, टेंभुर्णी**

**नगरपंचायतीचा निधी कोणाला नको आहे?**

टेंभुर्णी हे तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे. नगरपंचायत झाल्यास मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध होऊ शकतो. काहींना हा निधी गावात यावा असे वाटत नाही का, असा प्रश्न पडतो. आज ग्रामपंचायतीलाही मोठा निधी मिळतो; पण अनेक समस्या कायम आहेत. पाणी, रस्ते, स्वच्छता यांसारख्या प्रश्नांकडे नियमित दुर्लक्ष होत आहे. आता गावकऱ्यांनी आणि गावातील नेत्यांनी ठरवायचे आहे की टेंभुर्णीला नगरपंचायत हवी की नाही.

**- एक ज्येष्ठ नागरिक, टेंभुर्णी**

**नागरिकांचे प्रशासनाला प्रश्न**

नगरपंचायतीचा प्रस्ताव सध्या कोणत्या टप्प्यावर आहे?
जिल्हास्तरावर फाईल प्रलंबित असल्यास त्यामागील कारण काय?
आगामी निवडणुका ग्रामपंचायतीच्या होणार की नगरपंचायतीच्या?
लोकप्रतिनिधींनी या विषयावर शासन दरबारी नेमका किती पाठपुरावा केला?
वाढत्या लोकसंख्येला न्याय देण्यासाठी नगरपंचायतीचा निर्णय कधी होणार?
या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत टेंभुर्णीतील नागरिकांच्या मनातील नगरपंचायतीचे स्वप्न अधांतरीच राहणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## जालन्यात खंडेलवाल...

यावेळी सौ. प्रभा खंडेलवाल आणि सौ. एकता खंडेलवाल यांच्या हस्ते प्राजक्ता माळी यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

**नऊ दशकांची यशस्वी परंपरा**

कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करताना संचालक नितीन खंडेलवाल यांनी खंडेलवाल ज्वेलर्सच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला.

ते म्हणाले, मागील नऊ दशकांपासून ग्राहकांचा विश्वास, शुद्धता, दर्जेदार सेवा आणि पारदर्शक व्यवहार या तत्त्वांवर आम्ही व्यवसाय उभा केला आहे. विदर्भातील ग्राहकांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. आता मराठवाड्याच्या औद्योगिक आणि व्यापारी केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जालना शहरात नववे दालन सुरू करून आम्ही विस्ताराची नवी सुरुवात करत आहोत.

त्यांनी पुढे सांगितले की, ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक डिझाइन्स, प्रमाणित शुद्धता आणि अत्याधुनिक सेवा यांचा समन्वय साधण्यात आला आहे.

**सोनं म्हणजे संस्कृतीचा अविभाज्य भाग**

यावेळी प्राजक्ता माळी यांनी भारतीय संस्कृतीतील सोन्याच्या स्थानावरही भाष्य केले.

त्या म्हणाल्या, सोनं हे महिलांसाठी केवळ दागिना नसून आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि भावनिक नात्याचा भाग आहे. हजारो वर्षांपासून महिलांचे सोन्यावरील प्रेम कायम आहे आणि भविष्यातही ते तितकेच महत्त्वाचे राहील. खंडेलवाल ज्वेलर्समध्ये उपलब्ध असलेली डिझाइन्स, कलेक्शन आणि गुणवत्तापूर्ण दागिने महिलांना निश्चितच आकर्षित करतील.

९व्या शाखेनंतर ९०व्या शाखेच्या उद्घाटनालाही बोलवा

जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अविनाश गुप्ता यांनी खंडेलवाल ज्वेलर्सच्या प्रगतीचे कौतुक करताना शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले, आज मला ९व्या शाखेच्या उद्घाटनासाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली आहे. भविष्यात ९०व्या शाखेच्या उद्घाटनासाठीही मला आमंत्रित करण्यात यावे, अशी अपेक्षा आहे. ज्वेलरी क्षेत्रात अनेक उद्योजकांनी २५ ते ३० वर्षांत शेकडो शाखा सुरू केल्या आहेत. खंडेलवाल ज्वेलर्सची गुणवत्ता, ग्राहक सेवा आणि विश्वासार्हता पाहता तेही लवकरच शंभर शाखांचा टप्पा गाठतील, यात शंका नाही.

**सहाव्या पिढीचा व्यवसायात सक्रिय सहभाग**

संचालक रवी खंडेलवाल यांनी व्यवसायाच्या भविष्यातील वाटचालीबाबत माहिती देताना सांगितले की, कुटुंबाच्या सहाव्या पिढीतील हर्षल खंडेलवाल - शौर्या खंडेलवाल, प्रतीक खंडेलवाल - रिषिका खंडेलवाल तसेच प्रतीक राठी - दिपिका राठी हे व्यवसायात सक्रियपणे सहभागी झाले आहेत.

नवीन पिढीच्या सहभागामुळे आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल व्यवस्थापन, ग्राहकाभिमुख सेवा आणि नाविन्यपूर्ण संकल्पनांचा व्यवसायात समावेश होत आहे. त्यामुळे विस्ताराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत, असे त्यांनी सांगितले.

सराफा व्यावसायिक आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती

उद्घाटन सोहळ्यास जालना शहरातील सराफा बाजारातील व्यापारी, डॉक्टर, उद्योगपती, विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक, व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी नितीन खंडेलवाल आणि रवी खंडेलवाल यांचे अभिनंदन करून नवीन दालनाच्या यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मराठवाड्यातील ग्राहकांसाठी नवी पर्वणी जालना शहरात सुरू झालेल्या या अत्याधुनिक दालनामुळे ग्राहकांना पारंपरिक, आधुनिक, लग्नसराई, डायमंड, हलक्या वजनाचे तसेच नव्या ट्रेंडनुसार तयार करण्यात आलेल्या सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा विस्तृत संग्रह एकाच छताखाली उपलब्ध होणार आहे. ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य देत सुरू झालेली ही शाखा जालना आणि मराठवाड्यातील ग्राहकांसाठी एक नवी पर्वणी ठरणार असल्याची भावना उद्घाटन सोहळ्यात व्यक्त करण्यात आली.

# दुधना नदीपात्रातील अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांचा मोठा प्रहार; २०.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

## उपविभागीय पोलीस अधिकारी जालना यांच्या पथकाची मध्यरात्री धडक कारवाई; चालकासह वाहनमालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी**

जालना उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत तब्बल २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दुधना नदीपात्रातून बेकायदेशीररित्या वाळू उपसा करून त्याची चोरटी वाहतूक करणाऱ्या हायवा वाहनास पोलिसांनी पकडून चालकास ताब्यात घेतले असून वाहनमालकाविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांना गुप्त बातमीदारामार्फत दुधना नदीपात्रातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याची माहिती प्राप्त झाली होती. या माहितीची गंभीर दखल घेत कुलकर्णी यांनी विशेष पथकाला कारवाईचे आदेश दिले होते.

त्यानुसार रविवारी (दि. ३१ मे २०२६) पहाटे सुमारे १.४५ वाजेच्या सुमारास पोलीस पथक इंदेवाडी येथील पाण्याच्या टाकीजवळ सापळा लावून थांबले होते. दरम्यान गोलापांगरीकडून जालना शहराच्या दिशेने येणारा एक विनानंबर टाटा कंपनीचा हायवा संशयास्पदरीत्या येताना दिसला. पोलिसांनी तत्काळ वाहन थांबवून चालकाची चौकशी केली.चौकशीदरम्यान चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक असलेली रॉयल्टी पावती, परवाना अथवा कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याचे उघड झाले. त्यामुळे



पोलिसांनी हायवा वाहनासह चालकाला ताब्यात घेऊन पोलीस ठाणे तालुका जालना येथे आणले.

तपासात चालकाचे नाव सतीश बाबासाहेब खिल्लारे (वय ३०, रा. पिरपिंपळगाव, ता. जि. जालना) असे असल्याचे निष्पन्न झाले. तर वाहनाचे मालक ऋषी शिवाजी काकडे (वय ३०, रा. ढवळेश्वर नगर, जालना) असल्याचे समोर आले.

या प्रकरणी पोलीस ठाणे तालुका जालना येथे गुन्हा क्रमांक ३२२/२०२६ नोंद करण्यात आला असून आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) तसेच गौण खनिज विकास व नियमन कायद्याच्या कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**२०.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत पोलिसांनी अवैध वाळूने भरलेला टाटा हायवा व इतर साहित्य असा एकूण २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध वाळू माफियांविरोधात पोलिसांनी उचललेले हे कठोर पाऊल मानले जात असून जिल्ह्यातील अवैध उत्खनन करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

**अवैध वाळू उपशाविरोधात पोलिसांचा वाढता धाक**

जिल्ह्यात अनेक ठिकाणी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करून शासनाचा महसूल बुडविला जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा पार्श्वभूमीवर जालना पोलिसांनी केलेली ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या तसेच शासनाच्या महसुलाचे नुकसान करणाऱ्या अवैध वाळू व्यवसायावर यामुळे काही प्रमाणात अंकुश बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत वाचक पोलीस उपनिरीक्षक हरिश राठोड, पोलीस नाईक दादासाहेब चव्हाण आणि पोलीस कॉन्स्टेबल परमेश्वर धुमाळ यांनी सहभाग घेतला.

**अवैध वाळू माफियांना पोलिसांचा इशारा**

दुधना नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उत्खननावर पोलिसांनी केलेली ही कारवाई वाळू माफियांना स्पष्ट इशारा मानली जात आहे. परवाना व रॉयल्टीशिवाय वाळू वाहतूक करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून संकेत देण्यात आले आहेत.

# जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन



**जालना - प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार अनिल नव्हाते, नायब तहसीलदार सतिश तायडे, बि.ए.काबंळे, अरुण रंगे, सुनील काळुंखे, अनिल जोशी, वैभव चौधरी, शरद सरकटे, मोहन वायाळ, इंद्रजीत नानोटे, गजानन चव्हाण यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.




जालना वृत्तपत्र विक्रेत्या संघटनेकडून पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.गांधी चमन येथील वृत्तपत्र विक्रेते सेंटर व जालना वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या विद्याताई पांढरे यांच्या हस्ते अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी संघटनेचे रामेश्वर लहामगे, गजानन वीर, बालासाहेब खडेकर, गणेश वाळेकर, गणेश चिनके, संतोष लहाने,शंकर सिंग,ठाकूर,उमेद भदनेकर,शिवराज भंवर, विठ्ठलराव शहाने, दुर्गेश वाळेकर, गोपीचंद सलामबाद,मनोज गरदास, संजय लहाने, ज्ञानेश्वर बुरला आदी



अधिक मास निमित्त भाग्यनगर येथील गणपती मंदिर येथे श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी वेदशास्त्र संपन्न ह.भ.प.अमोल महाराज देशमुख, ह.भ. प. श्री.दीपक महाराज गुरव, श्री. सुमेध देशमुख, सौ. मनीषा ताई राजेश टोपे व भाग्यलक्ष्मी महिला मंडळ दिसत आहे. आयोजकांनी या कथा सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. छायाचित्र अनिल व्यवहारे

# अहिल्यादेवी होळकरांनी न्यायप्रिय, समतावादी समाज घडवला : भगवान माथले

## धनगर समाज संघर्ष समितीच्या वतीने अभिवादन

**जालना - प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी विकेंद्रीत लोकाभिमुख शासन ,प्रशासन करतांना विधवांना संपत्तीत अधिकार, दत्तक विधान सुलभ योजना,गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळलेल्या जमातींना शेती देऊन त्यांच्यावर प्रवाशांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. मंदिरे ,धर्मशाळा, घाट, विहिरी बांधून पायाभूत सुविधा मजबूत केल्या. कुशल प्रशासक, दूरदृष्टी असलेल्या अहिल्यादेवींनी न्यायप्रिय, समतावादी समाज घडवला असे प्रतिपादन धनगर समाज संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव माथले



यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त रविवारी (ता.३१) धनगर समाज संघर्ष समितीच्या वतीने काजळा आणि जालना शहरातील नियोजित स्मारक स्थळी जिल्हाध्यक्ष भगवान माथले यांच्या नेतृत्वात अभिवादन करण्यात आले. यावेळी येळकोट,, येळकोट ,,जय मल्हार..., राष्ट्रमाता, महाराणी, अहिल्यादेवी होळकरांचा विजय असो ...,राजे मल्हारराव होळकरांचा विजय असो,,,,! अशा गगनभेदी घोषणा देऊन कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला. कार्यक्रमास भाजपा युवा नेते शिवप्रकाश चितळकर ,मुख्याध्यापक बी. एस. आबुज, कपिल दहेकर ,संतोष लव्हटे, ज्ञानेश्वर भुसारे,बाबासाहेब वैद्य, निवृत्ती वीर, बापू देवकाते, अभिषेक खांडेकर, सौरभ भिसे, यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# अहिल्याबाई होळकर: कायद्याचे राज्य आणि आधुनिक न्यायप्रणालीची प्रेरणा

**जालना - प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे शासन केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून, ते आजच्या कायदेशीर आणि प्रशासकीय व्यवस्थेसाठी एक आदर्श मॉडेल आहे, असे मत जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार विजेत्या ॲड. अश्विनी धन्नावत यांनी व्यक्त केले.अठराव्या शतकात, जेव्हा कायद्याची संकल्पना व्यक्ती आणि सत्तेनुसार बदलत होती, तेव्हा माळव्याच्या शासक पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी 'कायद्याच्या राज्या'ची स्थापना करून एक अद्वितीय आदर्श निर्माण केला. त्यांचे प्रशासन केवळ शौर्य किंवा राजधर्मपुरते मर्यादित नव्हते, तर ते निःपक्षपाती न्याय आणि लोककल्याणाच्या सिद्धांतांवर आधारलेले होते. अलीकडेच, त्यांच्या नावाने दिला जाणारा प्रतिष्ठित जिल्हास्तरीय 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' स्वीकारल्यानंतर, प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ ॲड. अश्विनी धन्नावत यांनी अहिल्याबाईंच्या कायदेशीर दूरदृष्टीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

अहिल्याबाईंच्या न्यायप्रणालीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कायद्यासमोर सर्वांना समान मानण्याचा त्यांचा आग्रह. त्यांच्या राज्यात सामान्य प्रजा आणि राजघराण्यातील सदस्य यांच्यासाठी एकच कायदा होता. त्यांनी प्रशासकीय सुधारणा करून न्यायदानाची प्रक्रिया सुलभ आणि जलद केली. स्थानिक पातळीवर न्याय मिळावा यासाठी त्यांनी न्यायालयांची स्थापना केली आणि अधिकाऱ्यांची नियुक्ती गुणवत्तेच्या आधारावर केली. करप्रणालीत सुसूत्रता आणून त्यांनी राज्याच्या महसुलात वाढ



केली, पण त्याचा बोजा सामान्य प्रजेवर पडणार नाही, याचीही काळजी घेतली.

याप्रसंगी बोलताना ॲड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या,

अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी केवळ सन्मान नसून एक मोठी जबाबदारी आहे. मी आता स्वतःला त्यांची शिष्या मानते. त्यांचे कायदेविषयक विचार त्यांच्या काळाच्या कितीतरी पुढे होते.

आज आपण ज्या महिलांच्या अधिकारांबद्दल बोलतो, त्याची पायाभरणी अहिल्याबाईंनी विधवांना संपत्तीचा अधिकार देऊन आणि दत्तक विधान सुलभ करून केली होती. त्यांचे शासन हे विकेंद्रित आणि लोकाभिमुख प्रशासनाचे उत्तम उदाहरण आहे. त्यांनी केवळ कायदेच बनवले नाहीत, तर ते प्रभावीपणे लागू होतील अशी व्यवस्थाही निर्माण केली, जी आजच्या प्रशासकांसाठी आणि न्यायव्यवस्थेसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे.

अहिल्याबाईंनी गुन्हेगारी रोखण्यासाठी केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता, सुधारणावादी दृष्टिकोन ठेवला. त्यांनी गुन्हेगारीकडे वळलेल्या भिल्ल आणि गोंड जमातींना केवळ शिक्षा न करता, त्यांना सन्मानाने जगण्याची संधी दिली. त्यांना शेतीसाठी जमीन देऊन आणि प्रवाशांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवून त्यांनी गुन्हेगारीच्या मूळ कारणांवरच उपाययोजना केली.

हा दृष्टिकोन आधुनिक सुधारणावादी न्यायशास्त्राशी मिळताजुळता आहे. त्यांनी व्यापार आणि उद्योगाला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे राज्याची आर्थिक भरभराट झाली. महेश्वर येथे वस्त्रोद्योग सुरू करून त्यांनी महिला सक्षमीकरणाला चालना दिली. त्यांनी भारतभरात मंदिरे, धर्मशाळा, घाट आणि विहिरी बांधून केवळ धार्मिक कार्यच केले नाही, तर पायाभूत सुविधांचा एक मजबूत पाया रचला. थोडक्यात, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जीवन आणि कार्य हे केवळ एका राणीची गाथा नाही, तर ते एका कुशल प्रशासक, दूरदृष्टीच्या कायदेपंडित आणि खऱ्या अर्थाने 'लोकमाता' असलेल्या शासकाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांचा कायदेशीर आणि प्रशासकीय वारसा आजही ॲड. अश्विनी धन्नावत यांच्यासारख्या व्यावसायिकांना केवळ प्रेरणाच देत नाही, तर अधिक न्यायपूर्ण आणि समतावादी समाज घडवण्यासाठी मार्गदर्शक ठरतो.

# जालन्यात खंडेलवाल ज्वेलर्सच्या ९ व्या शाखेचे भव्य उद्घाटन

## पुणे-मुंबई पेक्षाही आकर्षक दागिन्यांची व्हरायटी पाहून थक्क झाले - अभिनेत्री प्राजक्ता माळी

**जालना । प्रतिनिधी**

विदर्भातील विश्वासार्हता, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकाभिमुख सेवांसाठी ओळखल्या जाणाऱ्या खंडेलवाल ज्वेलर्सने आपल्या व्यवसाय विस्ताराच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत जालना शहरात ९व्या शाखेचे भव्य उद्घाटन केले. बडी सडक परिसरातील आदित्य कॉम्प्लेक्स येथे शनिवारी (दि. ३१ मे) आयोजित करण्यात आलेल्या या उद्घाटन सोहळ्याला प्रसिद्ध अभिनेत्री आणि 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम प्राजक्ता माळी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नवीन दालनाचे उद्घाटन प्राजक्ता माळी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. यावेळी जेम्स अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिलचे राष्ट्रीय उपाध्यक्ष अविनाश गुप्ता (हैदराबाद), खंडेलवाल ज्वेलर्सचे संचालक नितीन खंडेलवाल व सौ. प्रभा खंडेलवाल, रवी खंडेलवाल व



सौ. एकता खंडेलवाल तसेच पुरुषोत्तम राठी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**प्राजक्ता माळींचे गौरवोद्गार**



उद्घाटनानंतर दालनाची पाहणी करताना अभिनेत्री प्राजक्ता माळी

यांनी खंडेलवाल ज्वेलर्समधील दागिन्यांच्या विविधतेचे विशेष कौतुक केले. त्या म्हणाल्या, मी पुणे आणि मुंबईसारख्या मोठ्या शहरांतील अनेक ज्वेलरी शोरूम पाहिले आहेत. मात्र खंडेलवाल ज्वेलर्समध्ये उपलब्ध असलेली आधुनिक, पारंपरिक आणि ट्रेंडनुसार डिझाइन केलेली दागिन्यांची व्हरायटी पाहून मी अक्षरशः थक्क झाले आहे. महिलांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन येथे तयार करण्यात आलेले कलेक्शन अत्यंत आकर्षक आहे.

# राबता वेल्फेअर अँड सोशल ग्रुप जालनाच्या वतीने मुस्लिम सामूहिक विवाह सोहळा संपन्न

**जालना-प्रतिनिधी**

जालना राबता वेल्फेअर अँड सोशल ग्रुप जालना च्या वतीने ३१ मे २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता मुस्लिम सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला आहे या विवाह सोहळ्यात ११ जोडपे विवाहबद्ध झाले आहे



राबता ग्रुप च्या तर्फे या जोडप्यांना कपडे पलंग बिस्तर आणि संसार उपयोगी वस्तू भेट म्हणून दिले हा कार्यक्रम शहरातील आयशा लॉन येथे रविवार ३१ मे रोजी साडेदहा वाजता यांच्या उपस्थितीत संपन्न झाले तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अयूब खान साहेब होते प्रमुख पाहुणे म्हणून इकबाल पाशा, दिलीप अर्जुने,इलियास याकूब, कल्याणराव दळे,डॉ विशाल धानुरे डॉ मुफ्ती नदीम परशुवाले मौलाना जाफ्राबाद डॉ नदीमा सय्यद, अब्दुल इमरान खान, अब्दुल हफिस उद्योजक, नगरसेवक, बदर चाऊस,विखार खान, मोहन इंगळे, सुलतान खान, आमेर पाशा फककरूल्ला खान,, सुभाष चंद्र कटारिया, आसिफ अन्सारी नगरसेवक, शेख रियाज,इमरान खान लाला, अमजद खान पठाण, माजेद खान नगरसेवक, सुजित कुमार जोगस, सरपंच सुभाष गिराम,सय्यद आमिर भाई, शाहेद शेख विष्णुपंत गिराम,सय्यद शमशू हबीब खान सलमान खान वाजेद खान माजेद शाहरुख खान विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संप्पन्न झाले आहे.

**विवाह सोहळा समिती**

संस्थापक अध्यक्ष सलीम यासीन खान पठाण उपाध्यक्ष शेरजमाखान कोषाध्यक्ष एडवोकेट शहबाज खान पठाण, सचिव अनस चाऊस कार्याध्यक्ष डॉ जावेद पठाण, सहसचिव एडवोकेट अश्फाक पठाण

सदस्य - अमीर शेर खान अमजद खान, जफर खान, सय्यद लतीफ,इमरान मनियार, कलीम खान पठाण, सय्यद करीम बिल्डर, हाजी बाबा भाई आमेर पाशा खान, अजिज पठाण,अतिक खान, सय्यद एजाज, डॉक्टर अजीम, डॉक्टर सय्यद अख्तर,अर्शद मिर्झा, अमजद पठाण, सलीम भाई, शेख मेहबूब, सय्यद शाकीर,साईद जागीरदार हे उपस्थित होते सलीम पठाण यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बक्षी सर यांनी केले तर प्रास्ताविक डॉ. जावेद पठाण यांनी केले शेवटी आभार मानून कार्यक्रममाचे शेवट झाले.

# राजूर-भोकरदन महामार्गावरील केदारखेडा येथे गतिरोधक बसवा

## उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे-पाटील यांची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

**राजुर -प्रतिनिधी**

राजूर-भोकरदन महामार्गावरील केदारखेडा येथे गतिरोधक बसून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात यावा, या संदर्भात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपतालुका प्रमुख अर्जुन ठोंबरे-पाटील यांनी भोकरदन उपविभाग सार्वजनिक बांधकाम व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करुन मागणी केली आहे. उपतालुकाप्रमुख ठोंबरे म्हणाले की, राजूर-भोकरदन महामार्गावर केदारखेडा गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. विशेषतः केदारेश्वर हॉस्पिटल परिसरात रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांची सतत ये-जा सुरू असते. तसेच शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ यांचीही मोठ्या प्रमाणावर बर्दळ असते. सदर ठिकाणी वाहनांचा वेग अत्यंत जास्त असल्यामुळे अपघात होण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे. यापूर्वी किरकोळ अपघात घडलेले असून भविष्यात मोठी जीवितहानी होण्याचा धोका नाकारता येत नाही. रुग्णालय परिसर असल्यामुळे रुग्णवाहिका, दुचाकीस्वार व पादचारी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर स्वरूपाचा बनला आहे. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने सदर ठिकाणी तात्काळ दर्जेदार गतिरोधक बसविण्यात यावा. तसेच आवश्यक त्या इशारा फलक, झेब्रा क्रॉसिंग, वेगमर्यादा दर्शक फलक व परावर्तक सुरक्षा चिन्हे लावण्यात यावीत,अशी मागणी उपतालुकाप्रमुख अर्जुन ठोंबरे-पाटील यांनी केली आहे.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर

## ५१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**मंठा । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठान, मंठा जिल्हा जालना यांच्या वतीने रविवार (दि. ३१ मे २०२६) रोजी ओम रामेश्वराय नमः महादेव (केदारनाथ) मंदिर, सुगंधा नगर, मंठा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजहिताची भावना जोपासत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान



करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. रक्तदान हे श्रेष्ठदान मानले जाते आणि गरजू रुग्णांसाठी रक्ताची आवश्यकता लक्षात घेऊन अनेक युवक, नागरिक व समाजबांधवांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदविला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा आदर्श समोर ठेवत समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून त्यांची जयंती साजरी करण्यात आली. रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते, त्यामुळे अशा उपक्रमांचे महत्त्व अधिक असल्याचे आयोजकांनी यावेळी सांगितले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदीप गायकवाड, आदित्य मिसाळ, आकाश रिकामे, आविष्कार मिसाळ, गणेश मिसाळ, संतोष मिसाळ, राजेश गायकवाड, कृष्णा गायकवाड, सूरज शेंडगे, आशिष शेंडगे,योगेश हातकडके, सुजल काळे, रामा मिसाळ, ओमकार माहोरकर, सचिन तायडे, व अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

यावेळी बाळासाहेब बोराडे, कृष्णा शेरे,दत्ता हातकडके, गणेश गायकवाड, शिवाजी हातकडके, विजय बोराडे, माऊली मिसाळ, गणेश शेंडगे, शिवाजी बनसोडे, यांची प्रमुख उपस्थित होती.

# राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

**परतूर -प्रतिनिधी**

परतूर येथील राजे मल्हार नगर, वखार महामंडळ रोड, परतूर तसेच अहिल्या नगर, पारडगाव रोड येथे राष्ट्रमाता, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन माजी नगराध्यक्ष मोहन शेठ अग्रवाल व माजी नगराध्यक्ष बापूराव आढाव यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमात



दैनिक पत्रकार तथा मौर्य क्रांती महासंघ सचिव हनुमंत दवंडे व रमेश भाऊ आढाव यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांनी आपल्या राज्यकारभारात न्याय, लोककल्याण, धर्मनिरपेक्षता व समाजहिताला सर्वोच्च प्राधान्य दिले. देशभरातील विविध तीर्थक्षेत्रांचा विकास, घाट, मंदिरे, विहिरी व धर्मशाळांचे बांधकाम करून त्यांनी समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीने प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याची गरज असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. जयंतीनिमित्त परिसरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण होते. नागरिक, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक नागरिक व समाजबांधवांच्या वतीने करण्यात आले.या वेळी उपस्थित गणेश पवार, माजी नगरसेवक लक्ष्मण भाऊ आढाव, उद्धव शेंडगे, योगेश गाते, दादाराव बकाल, राजेभाऊ गोरे, हातकडके सर, मंगेश आढाव, पांडुरंग भालेकर,कृष्णा सागुते, अंकुश गाते, तात्याराव गोरे, अंकुश भालेकर, प्रमोद पिसाळ, अमोल शेंडगे, आदीची यावेळी उपस्थिती होती.

# अज्ञानाचा नाश करण्याचे सामर्थ्य केवळ आत्मज्ञानातच-चिदंबरेश्वर महाराज साखरे

## तीन दिवसीय 'अक्षरब्रह्मयोग' श्रीमद्भगवद्गीता ज्ञानयज्ञाचा भक्तिमय वातावरणात समारोप

**जालना- प्रतिनिधी**

ज्याप्रमाणे कुस्तीच्या मैदानात मुख्य पैलवानाला पराभूत केले की इतर सर्व मल्लांवर विजय मिळवल्यासारखे होते, अगदी त्याचप्रमाणे आत्मस्वरूपाविषयीच्या मूळ अज्ञानाचा नाश झाला की जगातील इतर सर्व तूल अज्ञानांची निवृत्ती आपोआप होते. सर्व अज्ञानांचा एकाच वेळी नाश करण्याचे हे अफाट सामर्थ्य केवळ आत्मज्ञानात म्हणजेच मूळ ज्ञानात असल्यामुळेच त्याला गीतेत राजविद्या (विद्येमध्ये सर्वश्रेष्ठ राजा) असे संबोधले गेले आहे, असे अभ्यासपूर्ण प्रतिपादन आळंदी देवाची येथील प्रसिद्ध प्रवचनकार ह. भ. प. गुरुवर्य ॲड. चिदंबरेश्वर किसन महाराज साखरे यांनी केले.

येथील श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी सत्संग मंडळ आणि जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात



अक्षरब्रह्मयोग (श्रीमद्भगवद्गीता अध्याय ९ वा - राजविद्याराजगुह्ययोग) या विषयावर तीन दिवसीय भव्य ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. रविवार, दिनांक ३१ मे रोजी या ज्ञानयज्ञाचा अत्यंत भक्तीमय आणि उत्साही वातावरणात समारोप झाला, याप्रसंगी ॲड. साखरे महाराज बोलत होते. आपल्या निरूपणात महाराज पुढे म्हणाले की, जगातील भौतिक विषयांचे ज्ञान केवळ एका अज्ञानाला निवृत्त करते, परंतु आत्मज्ञान हे प्रधान मल्ल निबर्हण न्यायानुसार मूळ अज्ञानावरच प्रहार करते. त्यामुळे या श्रेष्ठ विद्येला राजविद्या मानले गेले आहे. अध्यात्म मार्गात केवळ गुरु शोधण्यापेक्षा स्वतःला अधिकार संपन्न शिष्य बनवणे अधिक महत्त्वाचे आहे. जेव्हा एखादा साधक खऱ्या अर्थाने पात्राता सिद्ध करतो, तेव्हा त्याला श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ सद्गुरू मिळवून देण्याची जबाबदारी स्वतः ईश्वर घेतो, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले. मानवी मानसिकतेवर बोलताना श साखरे महाराज म्हणाले की, आज समाजात हुशार लोकांची कमतरता नाही; बुद्धी भरपूर आहे, पण ती सरळ चालण्याऐवजी तिरपी चालते. यासाठी त्यांनी एका मराठी म्हणीचा आणि पालथ्या घड्यावर पाणी या उदाहरणाचा वापर केला. कितीही मोठी १० हॉर्स पॉवरची मोटर लावली आणि घडा जर उलटा ठेवला, तर त्यात पाणी भरणार नाही. तसेच, जर माणसाचे डोके (विचार) तिरपे असेल, तर त्याला दिलेला कोणताही चांगला उपदेश व्यर्थ ठरतो. संतांचा आवडता शब्द रोमणं (तिरपेपणा) वापरत, त्यांनी डोक्यातील हा तिरपेपणा दूर करण्याचे आवाहन केले.

राजकीय व सामाजिक टोमणा मारताना महाराज म्हणाले की, आजकाल काही लोकांकडे कोणालाही निवडून आणण्याची ताकद नसते, पण कोणालाही पाडण्याची कुवत नक्कीच असते! अशा तिरप्या मानसिकतेच्या लोकांना कितीही चांगला उपदेश केला तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही, कारण त्यांची मूळ प्रवृत्तीच नकारात्मक असते. मी देवाचा भक्त आहे किंवा हे माझे गुरू आहेत, असे सांगणारे लाखो मिळतील. परंतु, जेव्हा एखादे गुरू अभिमानाने सांगतात की हा माझा शिष्य आहे आणि देव स्वतः म्हणतो की हा माझा खरा भक्त आहे, तेच खरे भाग्याचे आणि श्रेष्ठत्वाचे लक्षण आहे. तुम्ही फक्त स्वतःला आध्यात्मिकदृष्ट्या पात्र (अधिकारी) बनवा, तुम्हाला योग्य गुरू नक्कीच मिळतील,हा मोलाचा संदेश देत साखरे महाराज यांनी समजलं तर उत्तम, नाही समजलं तर अतिउत्तम या त्यांच्या खास शैलीत रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

# जिल्हा ग्राहक तकार निवारणचा आयोगाचा हेल्थ विमा कपंनीला दणका

**जालना - प्रतिनिधी**

जालना येथील भुषण जवाहर जैस्वाल व त्यांची पत्नी मनिषा भूषण जैस्वाल यांनी निवा बुपा हेल्थ इंनशोरन्स कपंनी कडे आपला कुटूंब आरोग्य विमा काढला होता.मात्र हे दोघे दाम्पत्य आजारी पडले त्यांनी काढलेल्या विमा कपंनी कडे आरोग्य विमा मिळावा यासाठी सर्व कागदपत्राची पूर्तता करून विमा कपंनी कडे त्याची मागणी केली परंतु या विमा कंपनीने मात्र दोघे आजारी पडल्यावर त्यांचा क्लेम मंजूर केला नाही त्यांचे यासाठी या दोघे जैस्वाल दाम्पत्यचा अनुक्रमे रु. २४२१४/- व रु. ३२७६०/- हा कपंनीने नाकारला होता. विमा कंपनीच्या या मनमानी व्यवहारा विरुध्द दोघांनी त्यांचे सहाय्यक पंकज झाडीवाले यांच्या मदतीने जालना येथील जिल्हा ग्राहक तकार निवारण आयोगाकडे



ॲड अरविंद एम. जातोडे (मो. ८९९९२४५५६७) यांच्या मार्फत धाव घेतली. त्यांनी विमा कपंनी विरुद्ध तक्रार दाखल केली असता दोघांचा अर्ज सूनावणी अंती जिल्हा ग्राहक तक्रार आयोगाने अनुक्रमे रु. २४४१४ व रु. ५०६७७ रुपयांनी तसेच प्रत्येकी १०,०००/- खर्चासह मंजूर केला. या प्रकरणात विमा कंपनीला आयोगाचा दणका बसून शेवटी दोन्ही पक्षकारांना न्याय मिळाला. सदरचे सर्व कामकाज हे ॲड. ए. एम. जातोडे यांनी पाहीले होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.